निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी तांत्रिक छाननी समिती गठीत करणेबाबत.

जिल्हा परिषद धाराशिव
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्रमांक : जिपधा/मुकाअ स्वीय /परिपत्रक/२०२५/ ४०
दिनांक ०४ मार्च २०२५

संदर्भ :- खरेदी / मूल्यनिर्धारण समिती परिपत्रक जा.क्र.जिपधा.मुकाअ.स्वीय.२३१ दि.०६ सप्टेंबर २०२४.

**प्रस्तावना :**

धाराशिव जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागाकडे निविदा प्रक्रिया राबविण्यात येते. सदर निविदा प्रक्रिया नियमावलीचे काटेकोरपणे पालन करुन व अचूक पध्दतीने विहित कालमर्यादेत पार पाडणे आवश्यक आहे.

**परिपत्रक सूचना :-**

२. सर्व विभागांना सदर परिपत्रकाद्वारे निर्देशित करण्यात येते की, निविदा बाबींची सखोल तपासणी व कार्यवाही पूर्ण करण्यासाठी खालील प्रमाणे तांत्रिक समिती गठीत करण्यात यावी.

| अ.क्र. | पदनाम | निविदा तांत्रिक छाननी समिती |
|---|---|---|
| १ | संबंधीत विभाग प्रमुख | अध्यक्ष |
| २ | संबंधीत प्रशासन अधिकारी | सदस्य |
| ३ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी (वर्ग-२ दर्जा पेक्षा कमी नसावे) | सदस्य |

वरीलप्रमाणे गठीत समितीने विभागाकडील कोणत्याही निविदेमध्ये सहभागी Bidder/निविदाधारक यांच्या तांत्रिक बाबींची तपासणी करणे व निविदा अंतिम करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

३. निविदा प्रक्रिया राबविताना कोणत्याही प्रकारच्या तक्रारी उद्भवल्यास संदर्भ क्र.१ अन्वये गठीत खरेदी समितीच्या माध्यमातून तपशीलानुसार निर्णय घेण्यात यावा. केलेल्या कार्यवाहीबाबत इतिवृत्त तयार करण्यात यावे.

४. निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत प्रतिलिपी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांना अवलोकनार्थ सादर करण्याची दक्षता घ्यावी.

वरीलप्रमाणे परिपत्रकाची नोंद सर्व खाते प्रमुखांनी घेवून यथोचित कार्यवाही अनुसरावी.

(डॉ.मैनाक घोष) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, धाराशिव

प्रति,
१) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धाराशिव
२) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धाराशिव
३) सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुख, जिल्हा परिषद, धाराशिव.
४) सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती जि.धाराशिव.